# जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डिव्हीजन बुलडाणा सब डिव्हीजन व तालुका जळगाव जामोद पैकी मौजे ईस्लामपूर येथील खालील अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे जमीनधारकाच्या जमीनी मा. राज्यपाल महाराष्ट्र शासन यांचे नावे जलसंपदा विभागाचे प्राधिकृत प्रतिनिधी कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन बांधकाम विभाग, जळगाव व सहाय्यक कार्यकारी अभियंता, कुऱ्हा वढोदा उपसा सिंचन बांधकाम उपविभाग, वढोदा कुऱ्हा वढोदा उपसा प्रणालीच्या टप्पा क्र. ३ च्या पंपगृहासाठी आवश्यक जमिनी सन २०१३ च्या भूसंपादन कायद्यानुसार २६ ते ३० मुद्दे महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण ०३/२०१५ प्र.क्र.३४/अ-२ दि. १२.०५.२०१६ चे मार्गदर्शक तत्वे, महाराष्ट्र महसूल व वनविभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण ०३/२०१५/प्र.क्र. ३४/अ-२ दि. ३०.०८.२०१६ सुधारीत मार्गदर्शक तत्वे व महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण एलक्यु-०१/२०१७/प्र.क्र.१२/ अ-२ दि. २५.०१.२०१७ अन्वये खाजगी जमिनी वाटाघाटीने/व्यवहाराने सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन/ खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे.

खालील अनुसूची मध्ये संबंधित जमीन मालकाचे नांव, गट नंबर व संपादन करावयाचे क्षेत्र इ. तपशील दिला आहे. सदर जमिनीबाबत हिश्यावर हक्क, हितसंबंध, दत्तकपूत्र, वारसा हक्क, गहाण, दान, बोजा, बाकी, लिज, कर्ज, बक्षीसपत्र, जप्ती, करारमदार, वा इतर असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाच्या आत पुराव्यानिशी लेखी तक्रार कार्यालयीन वेळेत (सकाळी ११.०० ते सायं. ५.०० पर्यंत) उपविभागीय अधिकारी, जळगाव जामोद जि.बुलडाणा या कार्यालयास समक्ष अथवा रजिस्टर पोष्टाने इकडील कार्यालयास कळवावे, तसेच नमूद केलेल्या पत्त्यावर सर्व कागदपत्रांसह समक्ष येवून भेटावे व आपले असलेले हितसंबंधीत लेखी खात्री करुन घ्यावी. तसे न केल्यास कुणाचेही काही एक म्हणणे अगर हरकत नाही, असे समजून तसेच सदरील मिळकतीवर कोणाचा काहीही व कोणत्याही प्रकारे हितसंबंध नाही, असे समजून सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करुन व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचेवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

मुदतीत कोणतेही हरकत न आल्यास सदरहू जमीन मालकांची मिळकत निर्वेध व निर्जोखमी असल्याचे समजून इकडील कार्यालय महाराष्ट्र शासन यांचे वतीने मुदतीनंतर केव्हाही खरेदीचा व्यवहार पूर्ण करेल. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आल्यास ती या कार्यालयास कायदेशिररित्या बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी. ही खरेदीपूर्व नोटीस दिली.

- दि. ०४/०९/२०१७

## अनुसूची

### कुऱ्हा वढोदा इस्लामपूर उपसा सिंचन योजना

### गावाचे नाव - मौजे हाशमपूर, ता. जळगाव जामोद जि. बुलडाणा

| अ.क्र. | जमीन मालकांचे नाव | शिवार | गट नंबर | एकूण क्षेत्र | खरेदी/ संपादन करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | अशोककुमार विजयकुमार कोटेचा | ईस्लामपूर | १८३ | २.०२ | २.०२ |

**सहाय्यक कार्यकारी अभियंता**
**कुऱ्हा वढोदा उपसा सिंचन बांधकाम**
**उपविभाग, वढोदा**

**कार्यकारी अभियंता**
**उपसा सिंचन बांधकाम विभाग,**
**जळगाव**

सदरील नोटीस आमचे आशिलाचे माहितीवरुन विनंतीवरुन कागदपत्रांवरुन, अधिकारावरुन प्रसिध्द केली असे.

**ॲड. श्री.व्ही.एल. भटकर**
जळगाव जामोद
जि.बुलडाणा

**ॲड.श्री.अब्दुल हमीद शेख**
जळगाव जामोद
जि.बुलडाणा

Scanned by CamScanner